# **आकाशवाणी नागपूर,**
# **प्रादेशिक वृत्त विभाग**
# **प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
# **मंगळवार दिनांक ०६ जानेवारी २०२६**

## **ठळक बातम्या**

1. **स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा संकल्प व्यक्त करणारा काँग्रेसचा जाहीरनामा आज प्रसिद्ध.**
2. **विद्यार्थ्यांना परीक्षा संबंधित ताणतणावा संदर्भात सहाय्य करण्यासाठी सीबीएसईद्वारा मनो-सामाजिक समुपदेशन मदत वाहिनी सुरू.**
3. **माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचं आज पुण्यात वृद्धापकाळाने निधन.**
4. **विदर्भात थंडीची लाट; नागपुरात ७.६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद.**

**आता सविस्तर बातम्या .......**

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष पत्र परिषद

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज नागपूर महानगरपालिका निवडणूक-२०२६ साठी जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. नागपूर कॉंग्रेसचे शहराध्यक्ष आमदार विकास ठाकरे आणि इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या जाहीरनाम्यामध्ये नागरिकांना दर्जेदार आणि प्रभावी मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काँग्रेसन २० सूत्रांचा जन हितकारी आराखडा सादर केला असून, स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसन नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये समाधानकारक यश मिळवलं आणि महानगरपालिकांमध्ये देखील याची पुनरावृत्ती होईल, असा विश्वास सपकाळ यांनी व्यक्त केला..........

*नगरपालिकांमध्ये काँग्रेसला अपेक्षेपेक्षा जास्त यश ते मिळालं ती अपेक्षा आमची आहे आम्हाला तर ह्यापेक्षाही जास्त अपेक्षा होती. मात्र सर्वसाधारणपणे जे व्यवस्थेचं पैशाचा अहंकार मध्ये चाललेल होत त्या ठिकाणी आम्ही लढलो सर्वात मोठा विरोधी पक्ष महाराष्ट्रात काँग्रेस हा या नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वर उदय झाला आहे. ४१ नागरध्यक्ष आणि १ हजार ६ नगरसेवक आमचे निवडून आले आहेत. जी सुरुवातबाबतची जो कमबॅक केला आपल्याला बघता येऊ शकत हा महापालिकेमध्ये आता सुरु राहणार आहे नागपूरमध्ये काँग्रेस पुन्हा एकदा आपला महापौर असेल.*

‘निवडणूक आयोगान रात्री उशिरापर्यंत म्हणजे मतदानाच्या नऊ तास अगोदर प्रचार करण्यास मुभा दिली असून हे फक्त सत्ताधाऱ्यांना पैशांच्या बळावर निवडणुका जिंकता याव्या, यासाठी केल गेलं आहे’ असा आरोप त्यांनी यावेळी केला . नागपूर महानगरपालिकेतील सर्व १५१ नगरसेवकांना आंबेडकरी विचार मोर्चाचे समर्थन असल्याच देखील त्यांनी जाहीर केल. दरम्यान हर्षवर्धन सपकाळ हे आज नागपूर येथे प्रचार करणार असून उद्या ते अमरावती आणि अकोला येथील प्रचार सभेला उपस्थित राहतील.

प्रचारसभा

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचा प्रचार जोरात सुरु असून निवडणूक आयोग आणि प्रशासनाचीही तयारी सुरु आहे. मतदारांमधे मतदानविषयक जागृतीसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. तर मतदान आणि मत मोजणीसाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. अमरावती पोलीस आयुक्त आणि मनपा आयुक्त यांनी आज जमील कॉलनी परिसरातील विविध शाळांमधील मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली.यावेळी सुरक्षा व्यवस्था, प्रशासनिक तयारी, मतदार सुविधा आणि गर्दी नियंत्रणाबाबत आवश्यक निर्देश देत सुरक्षित आणि सुलभ मतदानावर भर देण्यात आला. दरम्यान, आज संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपुरात कळमेश्वर रोड, सक्करदरा आणि त्रिमूर्तीनगर चौक इथं प्रचार सभा घेणार आहेत.

## राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ

नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात सीएसआर परिषदेचं उद्घाटन आज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या  हस्ते झालं. 'पोषण सुरक्षा आणि कुपोषण निवारणामध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधीची भूमिका' या विषयावरच्या या परिषदेत मुलांमधल्या कुपोषणाचा सामना करण्यासाठी सहयोगी, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत धोरणांवर विचारमंथन होणार आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळानं या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेदरम्यान अमित शाह यांच्या हस्ते शिशु संजीवनी उपक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं असून त्याद्वारे नागपूर जिल्ह्यातल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये शिकणाऱ्या सुमारे तीन हजार मुलांना पौष्टिक आहार प्रदान करण्यात  येणार आहे.

## सीबीएसई

केंद्रीय माध्यमिक शिक्षणमंडळ-सीबीएसईनं विद्यार्थ्यांच्या, परीक्षा संबंधित ताणतणावासंदर्भात त्यांना सहाय्य करण्याच्या दृष्टीनं आज एक ‘मनो-सामाजिक समुपदेशन मदत वाहिनी’ सुरू केली आहे. दहावी आणि बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या सेवेचा पहिला टप्पा येत्या एक जूनपर्यंत सुरू राहणार आहे. येत्या परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांचा परीक्षाजन्य ताण तणाव कमी होऊन त्यांची मानसिक स्थिती सुदृढ रहावी, आणि त्यांनी आत्मविश्वासानं, समतोलपणानं, मानसिक स्पष्टतेसह परिक्षा द्याव्यात, या उद्देशानं मंडळानं ही सेवा सुरू केली आहे. विद्यार्थी १८०० ११८० ०४ या क्रमांकावर दिवसाच्या कोणत्याही वेळी या सेवेचा लाभ घेऊ शकतील.

## विकसित भारत- उद्योग सुलभीकरण

‘देशात व्यवसाय करणं सुलभ कसं होईल’ याकडे गेल्या अकरा वर्षांत केंद्र सरकारन लक्ष केंद्रित केलं. १९९१ हे आर्थिक सुधारणांचं वर्ष समजलं जातं तसं २०२५ हे नियंत्रण मुक्तीचं वर्ष ठरलं आहे, याविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

*उद्योग विस्तारताना छाननी प्रक्रिया, विविध निर्बंध तसेच गुंतागुंतीचे कामगार कायदे मोठे अडथळे ठरत होते. हे जटिल कामगार कायदे रद्द करून त्यांचे चार सुलभ श्रम संहितांमध्ये रूपांतर करण्यात आले, ज्यामुळे कायद्यात स्पष्टता आणि पारदर्शकता निर्माण झाली. परिणामी उद्योगवाढीस पोषक वातावरण तयार झाले. कडक नियमांमुळे देशांतर्गत उत्पादन आणि निर्यात दोन्हीवर परिणाम होत असल्याने सरकारने ७६ उत्पादनांना नियमनमुक्त केल आणि आणखी २०० उत्पादनांवरील नियंत्रण हटवल. ही नियंत्रणमुक्ती अधिक वेगाने राबवण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम उत्पादन आणि निर्यातीवर दिसून आला. यासोबतच लघु उद्योगांसाठी उलाढालीची मर्यादा दहापट वाढवून ती शंभर कोटी रुपयांपर्यंत नेण्यात आली आहे. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

दर्पण दिन

राज्यभरात आज ‘दर्पण दिन’ साजरा होत आहे. मराठी पत्रकारितेचे जनक ‘आचार्य बाळशास्त्री जांभेकर’ यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्तान पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था संघटना विविध कार्यक्रम आयोजित करत दर्पण दिन साजरा करत आहेत, तसंच बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन करत आहेत.

सुरेश कलमाडी निधन

कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचं आज पुण्यात वृद्धापकाळान निधन झालं, ते ८२ वर्षांचे होते. भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून सेवा बजावताना त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला होता. निवृत्तीनंतर ते राजकारणात सक्रीय झाले. १९८२ ते १९९६ अशी सलग १४ वर्षं, आणि नंतर १९९८ ते २००४ या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. १९९६ मधे लोकसभेत निवडून आले होते. कॉँग्रेसच्या सत्ताकाळात त्यांनी रेल्वे खात्याचं मंत्रीपद सांभाळलं. ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्षही ते होते. राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनात भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यान त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धक्का बसला होता.गेल्या वर्षी सक्तवसुली संचालनालयान दिलेल्या अहवालानंतर त्यांची आरोपातून

मुक्तता झाली होती.पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता.

सीआरएस

सीआरएस अर्थात नागरी नोंदणी प्रणाली सॉफ्टवेअर नोंदणीत अनियमितता आढळल्याप्रकरणी राज्य सरकारन एका विशेष 'तपास पथकाची' नियुक्ती केली आहे. तेराशे लोकसंख्या असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातल्या शेंदूरसनी या गावात जन्म आणि मृत्यूच्या २७ हजार नोंदी आढळल्याचं प्रकरण उघडकीस आलं होतं, या प्रकरणी हा तपास केला जाईल. या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा तपास यवतमाळ पोलीस करत आहेत.

व्हिबी_जी राम जी

केंद्र सरकारनं आणलेल्या व्हिबी जीरामजी या कायद्यामुळे आता १२५ दिवस रोजगार हमी देण्यात आली आहे. या कायद्यातील तरतुदी, गावाचा शाश्वत विकास होण्यासाठी मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास वाशीमचे मनरेगा राज्य प्रशिक्षक, रविंद्र इंगोले यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केल.

***हा कायदा आपल्या शाश्वत ग्रामविकासाला जणू काही परिसचं आहे. आपल्या गावाचा शाश्वत विकास करण्यासाठी सोशल ऑडिओ पीएम पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण पारदर्शकता मिळणार आहे. युक्तधारा पोर्टल हे सेतू ह्या सॉफ्टवेअर ला जोडलेलं आहे म्हणजेचं ऑनलाइन आराखडे तयार होतील म्हणजेच संपूर्ण पारदर्शकता येईल. मजुराला मजुरी वेळेवर मिळेल एकशे पंचवीस दिवसाची एका आर्थिक वर्षामध्ये केंद्र सरकारने गॅरंटी पण घेतलेली आहे बेरोजगारी भत्ता दिला जाणार आहे.***

थंडीचा कडाका

हवामान! विदर्भात आज  नागपूर,  भंडारा, गोंदिया, वर्धा आणि अमरावती इथ थंडीच्या लाटेचा इशारा प्रादेशिक हवामान खात्यान दिला असून  नागपूर, गोंदिया आणि अमरावती इथे उद्या देखील तापमान घसरण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. आज गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी ७ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली.  गोंदिया पाठोपाठ नागपूर इथं ७ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस, वर्धा येथे  ८ पूर्णांक ४ अंश,  सेल्सिअस, अमरावती इथं ९ पूर्णांक २ तर, भंडारा इथं १० अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

*****